SARFAESI Act, २००२ मधील सेक्शन १४ अंतर्गत मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हादंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशास अनुसरून पोलीस संरक्षण/ साहाय्य देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन परिपत्रक क्र. याचिका-०११९ /०१/ प्र.क्र.०१/ विशा-१ अ**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक: २२ एप्रिल, २०१९.

**वाचा :** गृह विभाग,शासन परिपत्रक क्र. याचिका-०११९ /०१/ प्र.क्र.०१/ विशा-१ अ, दिनांक २९ जानेवारी, २०१९.

संदर्भाधीन दिनांक २९ जानेवारी, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेले शासन परिपत्रक याद्वारे रद्द करण्यात येत आहे. यासंदर्भात सुधारित परिपत्रक मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेने खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

**प्रस्तावना :**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका १२/ २०१९ मध्ये दिनांक १५ एप्रिल, २०१९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी SARFAESI Act, २००२ मधील सेक्शन १४ अंतर्गत मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हादंडाधिकारी यांनी दिलेल्या ओदशास अनुसरून पोलीस संरक्षण / साहाय्य देण्याबाबत शासनाने सादर केलेल्या परिपत्रकाच्या मसुद्यास मा. न्यायालयाने मान्यता दिलेली आहे.

याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाने विभागीय तसेच क्षेत्रीय स्तरावरील पोलीस अधिकाऱ्यांना Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, २००२ (SARFAESI Act) मधील सेक्शन १४ अंतर्गत मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हादंडाधिकारी यांनी नागरी सहकारी बँकांसह बँकांनी तसेच वित्तीय संस्थांनी दिलेली कर्जाची वसुलीसाठी त्यांच्या कर्जदारांना सुरक्षित मालमत्तेची प्रत्यक्ष कब्जा मिळवून देण्याकरीता केलेल्या आदेशांची योग्य अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी परिपत्रक निर्गमित करण्याचे निश्चित केले आहे. SARFAESI Act, २००२ मधील सेक्शन १४ अन्वये, मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशांच्या अंमलबजावणीच्या वेळी पोलीस सहाय्य देण्यासाठी खालील सूचनांनूसार कार्यवाही करावी.

**परिपत्रक :**

१) राज्यातील सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांनी SARFAESI Act, २००२ मधील सेक्शन १४ अंतर्गत बँक आणि वित्तीय संस्थांनी दिलेल्या कर्जाची वसुलीच्या अनुषंगाने मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हादंडाधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशांची सुरळीत अंमलबजावणी करण्यासाठी मागणीनुसार पुरेसा पोलीस बंदोबस्त पुरविण्यात यावा.

२) SARFAESI Act, २००२ मधील सेक्शन १४ अंतर्गत प्रबंधंक किंवा मुख्य महानगर दंडाधिकारी यांनी नियुक्त केलेले ॲडव्होकेट कोर्ट कमिशनर किंवा जिल्हा दंडाधिकारी यांनी नियुक्त केलेले तहसीलदार किंवा मंडळ अधिकारी यांचेकडून प्राप्त कारवाईच्या आदेशानुसार बँकेचा अर्ज प्राप्त झाल्यापासून १० दिवसांच्या आत संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी सदर कामी आवश्यक सहाय्य करावे, यामध्ये कोणतीही टाळाटाळ करू नये. संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक यांनी आवश्यक पोलीस कर्मचा-यांची उपलब्धता विचारात घेऊन तात्काळ कार्यवाही करावी. संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी निरीक्षक यांनी त्यांचा या संदर्भातील निर्णय, संबंधित प्राधिकारी यांना प्रस्तावित कार्यवाहीच्या दिनांकापूर्वी शक्य तेवढ्या लवकर कळवावा.

३) बँकाच्या मागणीनुसार पोलीस सहाय्य देतेवेळी पोलिस अधिकारी यांनी संबंधित बँक तसेच वित्तीय संस्थांकडून कर्ज आणि सुरक्षा कागदपत्रांची मागणी किंवा पडताळणी करू नये. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी बँक अधिकारी, कर्जदार, गहाणदार किंवा सुरक्षित मालमत्तेवर कब्जा करणाऱ्या व्यक्तींचे जबाब नोंदवू नयेत.

४) मुख्य महानगर दंडाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशांच्या अंमलबजावणीसाठी पोलिस अधिकाऱ्यांनी संबंधित प्राधिकरणास मालमत्ता ताब्यात घेण्यास सहाय्य करावे. तसेच अशा आदेशांची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असेल तेव्हा बळाचा वापर करावा. बँकेच्या किंवा वित्तीय संस्थांच्या अधिकाऱ्यांनी सदर कार्यवाहीचे व्हिडिओ रेकॉर्ड करावे तसेच त्याचे संवर्धन करावे.

५) बंदोबस्त पुरविण्यात आल्यानंतर संबंधित बँकेकडून नियमानुसार विहीत केलेले बंदोबस्त शुल्क आकारण्यात यावे. सदर बंदोबस्त शुल्क प्राप्त करून ते रितसरपणे शासकीय तिजोरीत जमा करण्यात यावे व त्याची योग्य ती नोंद ठेवण्यात यावी.

SARFAESI Act, २००२ अंतर्गत बँका व वित्तीय संस्थांमार्फत कर्जाची वसुली करावयाच्या कारवाईबाबत उपरोक्त सर्व निर्देशांचे काटेकोरपणे पालन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०४२२१२०८५४०४२९ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Damodar Patil

Digitally signed by Vijay Damodar Patil
DN: CN = Vijay Damodar Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Home Department
Date: 2019.04.22 12:32:38 +05'30'

**( विजय पाटील )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन
गृह विभाग.

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई.
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई..
८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) सर्व पोलीस आयुक्त.
१०) सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक.
११) सर्व जिल्हाधिकारी.
१२) सर्व पोलीस अधीक्षक.
१३) सरकारी अभियोक्ता, अपील शाखा (रिट सेल), उच्च न्यायालय, मुंबई.
१४) निवड नस्ती.

**Regarding providing of Protection/ assistance by the police personnel while implementing orders passed by the Chief Metropolitan Magistrate or District Magistrates under Section 14 of SARFAESI Act, 2002.**

**Government of Maharashtra**
**Home Department**
**Government Circular no. Petition – 0119 / 01 / C.R.01 / Special1A,**
Mantralaya, Mumbai-400 032.
Date: 22 April, 2019.

**<u>Refer</u>:** Home Department, Government Circular no. Petition – 0119 / 01 / C.R.01 / Special1A, Dated 29.01.2019

Above referred Government Circular issued dated 29.01.2019 is stand cancelled. It is modified by this circular, as approved by Hon'ble High Court.

**<u>Introduction:</u>**

Hon'ble High court of judicature at Bombay approved the draft regarding providing of Protection / assistance by the police personnel while implementing orders passed by the Chief Metropolitan Magistrate or District Magistrates under Section 14 of SARFAESI Act, 2002, at the time of hearing of Writ Petition No. 12 of 2019 on 15th April 2019.

The Government of Maharashtra has decided to issue circular to the police officers at the subordinate divisional level for ensuring proper implementation of orders passed by the chief metropolitan magistrate (CMM) or district magistrate (DM) under section 14 of the Securitization and Reconstruction of Financial Assets and Enforcement of Security Interest Act, 2002 (SARFAESI Act) for taking physical possession of secured assets for the recovery of loan granted by banks and financial institutions including Urban Cooperative Banks to their borrowers. Accordingly, the following guidelines are issued for providing police assistance during the course of implementation of the orders passed by CMM or DM, as the case may be under Section 14 of the SARFAESI Act.

**Circular:**

1. All the Commissioner of Police and Superintendent of Police should ensure that, as and when demanded, adequate police force is provided for smooth implementation of orders passed by the CMM or DMs under section 14 of the SARFAESI Act for taking over possession of the secured assets for recovery of loans granted by banks and financial institutions.

2. The Inspectors in charge of the concerned police stations shall endeavor to provide the police assistance and shall not avoid the same. The Inspector in charge of the concerned police station shall take decision with respect to the availability of police personnel, immediately, and, in an event, within 10 days of receipt of communication from the Registrar or Advocate Court Commissioner appointed by the CMM or from the Tehsildar or Circle Officer appointed by the DMs intimating proposed date of implementation of orders under section 14. The inspector in charge of the concerned police station shall intimate his decision to the concerned authority as early as possible and reasonable time before the proposed date of implementation.

3. While providing assistance as demanded, the police authorities shall not verify or demand copies of loan and security documents from the banks and financial institutions. The police authorities shall not record statements of the Banks Officers, borrowers, Mortgagors or Persons in occupation of the secured assets.

4. It shall also be ensured that the police officials deputed for providing assistance for implementation of orders passed by CMM /DMs shall assist the concerned authority in taking physical possession and shall use force whenever necessary, for proper implementation of such orders. The officers of the bank or financial institutions should video-record the proceedings and maintain the same.

5. The prescribed fee for providing police assistance should be recovered from the concerned bank or financial institutions. The said fee should be duly deposited in the treasury and proper record of the same should be maintained.

All the aforesaid instructions should be meticulously complied with for expediting the process of recovery of defaulted loans by the banks and financial institutions under the SARFAESI Act, 2002.

This Government Circular of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201904221208540429. This Circular has been signed digitally.

By order and in the name of Governor of Maharashtra

Vijay Damodar Patil

Digitally signed by Vijay Damodar Patil
DN: CN = Vijay Damodar Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Home Department
Date: 2019.04.22 12:32:57 +05'30'

**(Vijay Patil)**
**Deputy Secretary to Government of Maharashtra**
**Home Department.**

**Copies to:**

1. The Secretary to the Honorable Governor, Maharashtra State, Raj Bhavan, Mumbai.
2. The Additional Chief Secretary to the Honorable Chief Minister, Mantralaya, Mumbai.
3. The Private Secretaries of all the Ministers / Ministers of State.
4. Honorable Leader of the Opposition, Legislative Assembly and Legislative Council, Legislature House, Mumbai.
5. Honorable Chief Secretary, Maharashtra State.
6. Additional Chief Secretary / Principal Secretary, Home Department.
7. Principal Secretary, Cooperatives Department
8. Director General of Police, Maharashtra state, Mumbai.
9. All the Commissioners of Police.
10. All the Special Inspector Generals of Police of the zones
11. All District Collectors.
12. All the Superintendents of Police.
13. Government Public Prosecutor, Appeal side (Writ), High Court, Mumbai.
14. Select file.